**महावितरण**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका/न.क्र.८९५**

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,

तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,

मुंबई - ४०० ०१९.

email : cgmhrmsedcl@gmail.com

website : www.mahadiscom.in

दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१


# प्रशासकीय परिपत्रक क्र. ७१० दि. २१ / ०७ / २०२६

**विषय :** कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ७० व्या बैठकीतील कर्मचारी कल्याण निधीच्या वर्गणीमध्ये झालेल्या वाढीची रक्कम वेतनातुन कपात करण्याबाबत.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र.२९० दि.२८.०४.२०१०.

२) औद्योगिक संबंध विभाग, परिपत्रक क्र.काऔसंवि/ब/ककनिस/७०वी बैठक/१२३४५ दि.१३.०४.२०२६.

*****

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण या तीन्ही कंपन्यांमध्ये कल्याणकारी योजना राबविण्याकरीता कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ७० व्या बैठकीमध्ये विविध निर्णय घेण्यात आलेले आहेत. सदरचे निर्णय संदर्भिय क्र.२ च्या परिपत्रकान्वये पारीत करण्यात आलेले आहेत. कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनेतील सुधारीत तरतुदी अंमलात आणण्याकरीता कर्मचारी कल्याण निधी वर्गणी मध्ये वाढ करणे आवश्यक होते.

२. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ७० व्या बैठकीमध्ये कर्मचारी कल्याण निधीमध्ये वाढ करण्याकरीता झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सक्षम अधिकारी यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या मासिक वेतनातुन कल्याण निधी वर्गणी रु.१०/- ऐवजी रु.१००/- अशी कपात माहे एप्रिल-२०२६ पासुन करण्याबाबत मंजूरी प्रदान केलेली आहे.

३. सबब, कंपनीतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या मासिक वेतनातून कर्मचारी कल्याण निधीची वर्गणी रु.१०/- ऐवजी रु.१००/- या प्रमाणे कपात करण्यात यावी. तसेच सदर कपातीबाबतची प्रचलित कार्यपध्दती यापुढेही चालू राहील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या E-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**

**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रति,**

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.